Prabhat 6th Dec. 2011 Page no. 3

# 'जकातीला पर्याय काय' विषयावर बुधवारी कार्यशाळा

पुणे - मूल्यवर्धीत करप्रणाली अंमलात आणताना जकात रद्द करू, असे आश्‍वासन महापालिकेने दिले होते; प्रत्यक्षात ते पाळले नाही. आजही जकात भरावी लागते. या पार्श्‍वभूमीवर 'जकातीला पर्याय काय' या विषयावर पुणे नागरिक संघटनेने चर्चासत्राचे आयोजन केले आहे. टिळक रस्त्यावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात येत्या बुधवारी (दि. ७) संध्याकाळी सहा ते आठ या वेळेत हे चर्चासत्र होणार आहे. मराठा चेंबर्सचे अध्यक्ष अनंत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या चर्चासत्रात सराफ असोसिएशनचे अध्यक्ष फत्तेचंद रांका, ग्राहक पेठेचे कार्यकारी संचालक सूर्यकांत पाठक, पूना मर्चंट चेंबरचे अध्यक्ष अजित सेठिया, रिटेल फेडरेशनचे अध्यक्ष पोपट ओस्तवाल आणि राज्यस्तरीय करसमितीचे अध्यक्ष गोविंदराव पटवर्धन हे सहभागी होणार आहेत. पुणे नागरिक संघटनेचे रमेश आगरवाल, विवेक वेलणकर आणि विजय वरूडकर यांनी ही माहिती दिली.